
UGC Approved Sr. No. 49366

GLOBALLY INDEXED 6.177

deleted

Online ISSN -2278 8808
Printed ISSN- 2349-4766




**An International Peer Reviewed**

**Referred Quarterly**

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC, 2017. VOL. 6, ISSUE-34

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

5

293 वस्तु आणि सेवा कर (GST) : रचना, परिणाम आणि भवितव्य
प्रा. डॉ. [illegible] & प्रा. सुरेश हिलाल पाटील (1298-1303)
294 भारतात श्रमीकांच्या वेतनासंबंधी धोरण ही काळाची गरज
डॉ. [illegible] (1304-1307)
295 जीएसटीचा भविष्यात तेलाच्या किंमतीवरील परिणाम अभ्यासने
प्रा. डॉ. संजय परशराम देवरे (1308-1310)
296 वस्तु व सेवा कराचा भारतीय शेतीवर होणारा परिणाम
नितिन नारायण जाबरे (1311-1314)
297 शिक्षण प्रणाली आणि आर्थिक विकास
श्रीमती. कदम जयश्री लक्ष्मण (1315-1317)
298 महाराष्ट्र राज्यातील मानव विकास निर्देशांकाच्या परिणामकारकतेचे अध्ययन
प्रा. डॉ. पवार नानासाहेब चंद्रभान (1318-1326)
299 जलसंवर्धननिती सुराज्य निर्मिती
रणाते सुनिता विजय (1327-1336)
300 ई — बॅकिंग सेवा व फायदे
प्रा. डॉ. आदिनाथ रावसाहेब पोलप (1337-1339)
301 महाराष्ट्र शासनाच्या कृषीविषयक अंदाजपत्रकीय तरतूदीचा अभ्यास
देशमुख अश्विनी हरिश्चंद्र & प्रा. डॉ. काळे एस. बी. (1340-1343)
302 भारतीय शेतीचा नियोजनात्मक विकास
डॉ. अनिल दि.वाडकर (1344-1352)
303 भारतातील लोकसंख्या रचनेतील बदलांचा अभ्यास
डॉ. कदम प्रमोदिनी & कु. जगताप मंगल बाबासाहेब (1353-1357)
304 असंघटीत श्रमिकांतील आर्थिक विषमता
प्रा.डॉ.आबासो ह.शिंदे (1358-1363)
305 बाल मजुरी : समस्या, कारणे आणि परिणाम
प्रा. सतिश आशिनाथ गोंडे (1364-1367)
306 भारतातील पर्यटन विकास
प्रा. सुनील दशरथ साळवे (1368-1379)
307 जीएसटी : स्वरूप व रचना
प्रा. डॉ. ए. टी. तवार (1380-1384)
308 नाशिक जिल्ह्यातील टोमॅटो वितरण साखळ्या
प्रा. साहेबराव दौलत निकम (1385-1389)
309 वस्तू व सेवा कर प्रणाली
पांडुळे अंजली विष्णु (1390-1394)

# भारतातील लोकसंख्या रचनेतील बदलांचा अभ्यास

**डॉ. कदम प्रमोदिनी & कु. जगताप मंगल बाबासाहेब**
*सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, एस.एम.बी.एस.टी. महाविद्यालय, संगमनेर*
*संशोधक विद्यार्थिनी, एस.एम.बी.एस.टी. महाविद्यालय, संगमनेर*

**सारांश :–** प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशातील लोकांच्या विकासावर अवलंबून असतो. त्यामुळे लोकसंख्येची स्थिती हा देशाच्या विकासातील एक महत्वाचा प्रमुख घटक आहे. भारतातील लोकसंख्या विषयक आज पर्यंतची आकडेवारी लक्षात घेतल्यास यातील सांख्यिकिय माहितीकडे केवळ आकडेवारी म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. यातून स्पष्ट होणा या बाबी व निर्माण होणा–या सामाजिक प्रश्नाकडे अत्यंत लक्ष देण्याची आवश्यकता आहे? जगात दुसरा कमांक असणा–या भारताच्या लोकसंख्येत स्त्री–पुरूष प्रमाण, तरुण–तरूणींची मोठी संख्या तसेच वाढत जाणारी जेष्ठांची संख्या या सर्व बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना :–** जगाची लोकसंख्या नुकतीच 700 कोटी झाली आहे. सध्या भारताची लोकसंख्या सुमारे 125 कोटी आहे. त्यापैकी 64 कोटी पुरूष तर 61 कोटी महिला आहेत. देशात सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यामध्ये प्रथम कमांक उत्तर प्रदेश तर त्या खालोखाल दुसरा कमांक महाराष्ट्र राज्याचा लागतो. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणा–या सामाजिक प्रश्नांकडे अत्यंत लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांनी पावले उचललेली आहे.

**शोधनिंबधाचा उद्देश :–**

1. भारतातील लोकसंख्या वाढीच्या दराचा अभ्यास करणे.
2. भारतातील एकूण लोकसंख्येतील स्त्री–पुरूष प्रमाण अभ्यासणे.
3. भारतातील जन्मदर, मृत्युदर आणि सरासरी आयुर्मानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :–** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधकाने संशोधनासाठी दुय्यम तथ्य सकंलन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी संशोधकाने शासकिय संकेतस्थळ, अहवाल, मासिके व इंटनरेट यांचा वापर केला आहे.

**1. भारतातील एकुण लोकसंख्या आणि लोकसंख्या वाढीचा दर :–** लोकसंख्येच्या दृष्टीने भारत जगात सध्या दुस–या कमाकावर आहे. पहिला कमांक अर्थातच चीनचा आहे. सध्याच्या भारतीय लोकसंख्या वाढीचे प्रमाण लक्षात घेता सन 2025 पर्यंत भारत चिनला मागे टाकून प्रथम कमांकावर येउ शकेल. सध्याच्या जागतिक लोकसंख्येत भारताचा वाटा 17 टक्के आहे. परंतु जगाच्या भूभागापैंकी फक्त 2.4 टक्के भूभाग भारताने व्यापला आहे. दरवर्षी भारतीय लोकसंख्येत सुमारे 1.8 कोटींची भर पडते.

तक्ता क्र 1 भारतातील एकूण लोकसंख्या आणि लोकसंख्या वाढीचा दर

| वर्ष | लोकसंख्या दशलक्ष | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|
| 1901 | 238.4 | 0 |
| 1911 | 252.2 | 0.56 |
| 1921 | 251.3 | 0.03 |
| 1931 | 279.0 | 1.04 |
| 1941 | 318.7 | 1.33 |
| 1951 | 361.1 | 1.25 |
| 1961 | 439.2 | 1.96 |
| 1971 | 548.1 | 2.20 |
| 1981 | 683.3 | 2.22 |
| 1991 | 843.3 | 2.14 |
| 2001 | 1027.0 | 1.64 |

तक्ता क्र 1 नुसार विसाव्या शतकातील किंवा गेल्या 110 वर्षातील भारतीय लोकसंख्या चार गटात विभागता येते. तक्ता क. 1 नुसार स्पष्ट होणारी गोष्ट म्हणजे लोकसंख्या वाढत असली तरी लोकसख्या वाढीचा वेग निश्चितपणे कमी झालेला आहे. जो वेग 1971--1981 च्या दरम्यान होता, तो 2001--2011 मध्ये महत्वपूर्णरित्या खाली आला आहे. भारतीय लोकसंख्येच्या इतिहासात 1911 1921 या काळात फक्त एकदाच लोकसंख्या कमी झाली होती. त्यावेळी वाढीचा वेग ऋण झाला होता. पहिले जागतिक महायुध्द तसेच प्लेगच्या साथीत सुमारे 30 लाख मृत्यू झाले होते. याशिवाय 1918 मध्ये आलेल्या फन्फ्ल्यूएंझाच्या साथीत 1.2 ते 1.3 कोटी लोकांना प्राण गमवावा लागला होता. लोकसंख्या दुप्पट होण्याचा जो वेग आहे. त्यावरुन लोकसंख्या किती जलद गतीने वाढते आहे. याचा अंदाज बांधता येतो. सन 1901 मध्ये असणारी 23.8 कोटी लोकसंख्या दुप्पट होण्यासाठी 60 वर्षाचा कालावधी जावा लागला. त्यानंतर मात्र 30 वर्षातच लोकसंख्या दुप्पट झाली. हा काळ अत्यंत जलद लोकसख्यांवाढीचा होता आणि तेंव्हाच लोकसंख्या हा एक दृष्टीने अतिशय महत्वाचा आणि थोडासा काळजीचा मुद्दा म्हणुनही पुढे आला. मागील दोन दशकांत लोकसंख्या वाढीचा वेग मंदावला असला तरी आणखी काही काळापर्यंत लोकसंख्या वाढत राहणार आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आधीची मुळातच जास्त असणारी लोकसंख्या आणि लोकसंख्येचे वयानुसार वर्गीकरण. भारतीय लोकसंख्येच्या एक तृतीयांश व्यक्ती 18 वर्षाखालील आहे. तसेच 50 कोटींहून अधिक व्यक्तींनी अद्याप वयाची 25 वर्षे पुर्ण केलेली नाहीत. सुमारे 51 टक्के लोकसंख्या जननक्षम वयोगटातील असून, दरवर्षी लाखो व्यक्ती या गटात समाविष्ठ होत आहेत आणि ही गोष्ट लोकसंख्यावाढीशी निगडीत आहे.

**2. भारतातील एकुण लोकसंख्येतील स्त्री –पुरुष प्रमाण** देशाच्या एकूण लोकसंख्येत दर हजार पुरूषांमागे किती स्त्रिया आहेत त्या प्रमाणाला स्त्री– पुरूष प्रमाण म्हणतात. अमेरिका, युरोप, रशिया, जपान इ. देशांत पुरूषांपेक्षा स्त्रीयांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळते. याउलट ऑस्ट्रेलिया कॅनडा, भारत इ. देशांत पुरूषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. भारतातील स्त्री पुरूष प्रमाण सातत्याने घटत जात असल्याचे दिसून येते. ते पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट होते.

तक्ता क्र. 2 भारतातील एकूण लोकसंख्येतील स्त्री--पुरुष प्रमाण

| अ.न. | वर्ष | दर हजारी पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|---|
| 1 | 1901 | 972 |
| 2 | 1911 | 964 |
| 3 | 1921 | 955 |
| 4 | 1931 | 950 |
| 5 | 1941 | 945 |
| 6 | 1951 | 946 |
| 7 | 1961 | 941 |
| 8 | 1971 | 930 |
| 9 | 1981 | 934 |
| 10 | 1991 | 927 |
| 11 | 2001 | 933 |
| 12 | 2011 | 940 |
| 13 | 2016 | 943 |

वरील तक्ता क्र. 2 नुसार असे दिसून येते कि 1901 ते 2011 पर्यंत पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण सातत्याने कमी राहिले आहे. देशातील स्त्री--पुरुष प्रमाण जन्मदर 1901 ते 2011 याचा विचार करता असे लक्षात येते कि 1981 व 2011 मध्ये यात थोडी वाढ झाली आहे. हे अपवाद वगळता इतर दशकात सातत्याने स्त्री पुरुष प्रमाणात घट झाली आहे. याचे मुख्य कारण स्त्रियांना मिळणारे सामाजिक गौण स्थान हेच दिसून येते.

**3. भारतातील जन्मदर, मृत्युदर आणि सरासरी आयुर्मान** जन्मदर आणि मृत्युदर यामधील फरकावरून लोकसंख्येची नैसर्गिक वाढ कळते. जन्मदर जास्त आणि मृत्युदर कमी असेल तर लोकसंख्येत वाढ होते. जगभर लोकसंख्या वाढीचा दर खाली आणण्यात जन्मदर कमी करण्याबरोबरच मृत्युदर खाली आणण्याचाही प्रयत्न असतो. भारतातील जन्मदर व मृत्युदर प्रमाण आणि भारतातील व्यक्तींचे सरासरी आयुर्मान पुढील तक्त्यामध्ये सविस्तर दिले आहे.

**तक्ता क. 3 भारतातील जन्मदर, मृत्युदर आणि सरासरी आयुर्मान**

| अ.न | वर्ष | जन्मदर दर हजारी | मृत्यूदर दर हजारी | सरासरी आयुर्मान वर्ष |
|---|---|---|---|---|
| 1 | 1901 ते 1911 | 48.1 | 42.6 | 22.9 |
| 2 | 1911 ते 1921 | 48.1 | 48.6 | 20.0 |
| 3 | 1921 ते 1931 | 46.4 | 36.3 | 26.8 |
| 4 | 1931 ते 1941 | 45.2 | 31.2 | 31.8 |
| 5 | 1941 ते 1951 | 39.9 | 27.4 | 32.1 |
| 6 | 1951 ते 1961 | 41.7 | 22.8 | 41.2 |
| 7 | 1961 ते 1971 | 41.2 | 19.0 | 45.0 |
| 8 | 1971 ते 1981 | 37.2 | 14.8 | 53.5 |
| 9 | 1981 ते 1991 | 31.7 | 11.0 | 58.7 |
| 10 | 1991 ते 2001 | 27.2 | 8.9 | 64.7 |
| 11 | 2001 ते 2011 | 20.97 | 7.4 | 67.4 |

तक्ता क्र. 3 नुसार भारतात इ.सन 1901 ते 1911 या दशकात जन्मदर व मृत्युदर दोन्हीही जास्त असल्याने सामान्य भारतीयाचे सरासरी आयुर्मान कमी म्हणजे केवळ 22.9 वर्षे एवढे होते. 20 व्या शतकाच्या दुसऱ्या या दशकात जन्मदर 48.1 इतका होता तर प्लेग, कॉलरा, मलेरिया या सारख्या साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे मृत्यूदरात वाढ होऊन तो 48.6 इतका झाला व या काळात लोकसंख्येत घट झाली तसेच या काळात भारतीयांचे सरासरी आयुर्मान 20 वर्षे इतके होते. पुढे मात्र मृत्यूदरात क्रमशः घट होत गेली. त्या मानाने 1951 नंतर जन्म दरातील घट जरा मंद गतीने झाली व सामान्य भारतीयांच्या सरासरी आयुर्मानात वाढ होत इ.सन 1981 ते 1991 मध्ये सरासरी आयुर्मान 58.6 वर्ष इतके झाले तर 1991 ते 2001 मध्ये सरासरी आयुर्मान 64.7 वर्ष आणि 2001 ते 2011 मध्ये सरासरी आयुर्मान 67.4 इतके झाले.

**4.भारतातील लोकसंख्येचे वयोगटानुसार वर्गीकरण :–** कोणत्याही देशाची आर्थिक स्थिती तेथील श्रमिक संख्येवर अवलंबून असते. देशात विविध प्रकारचे उत्पादन तेथील श्रमिक किंवा कार्यकारी घटक करतात. त्यामुळे श्रमिकांची संख्या माहिती असणे आवश्यक असते. ही देशातील स्वावलंबी व्यक्तींची संख्या होय. बालक आणि वृध्द लोकसंख्या काम करू शकत नाहीत. ते देशातील श्रमिकांवर अवलंबून असतात. त्यांची संख्या ही परावलंबी किंवा अकार्यकारी व्यक्तींची संख्या होय. देशातील 15 ते 60 वयोगटातील व्यक्ती ही श्रमिक माणली जातात. 0 ते 14 वयोगटातील व्यक्ती शिशू गटात तर 60 वर्षापुढील व्यक्ती अकार्यकारी किंवा परावलंबी गटात समाविष्ट होतात. वय हा प्रत्येकाचा अतिषय प्राथमिक गुणविशेष आहे. वयानुसार लोकसंख्येचे स्वरूप बदलणे अपेक्षित आहे. आणि त्या नुसार ते बदलतही आहेत. लहान वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण जास्त तर वृध्दांचे कमी ही सध्याची स्थिती आहे. ती हळुहळू बदलतांना दिसत आहे. दिवसेंदिवस लहान वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण कमी होत जावून वृध्दांच्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे.

**तक्ता क. 4 भारतातील लोकसंख्येचे वयोगटानुसार वर्गीकरण**

| वर्ष | 0 ते 14 वयोगट | 15 ते 59 वयोगट | 60 हुन अधिक वर्षाचा वयोगट |
|---|---|---|---|
| 1951 | 38.4 | 56.0 | 5.5 |
| 1961 | 41.0 | 53.3 | 5.6 |
| 1971 | 42.6 | 52.0 | 6.6 |
| 1981 | 39.5 | 54.6 | 6.5 |
| 1991 | 37.5 | 55.7 | 6.8 |
| 2001 | 35.4 | 57.0 | 7.5 |
| 2011 | 30.9 | 60.5 | 8.6 |

तक्ता क. 4 मध्ये गेल्या 60 वर्षातील लोकसंख्येचे वयानुसार वर्गीकरण दाखविले आहे. 1951 मध्ये 38 टक्के असणारे मुलांचे प्रमाण 2011 मध्ये 31 टक्क्यांपर्यत खाली आले आहे. तर याच काळात वृध्दांचे प्रमाण 5.5 टक्क्यांपासून 8.6 टक्क्यांपर्यत वाढले आहे. अशीच वाढ 15 ते 59 वयोगटात म्हणजेच काम करणा–या व्यक्तींमध्येही झालेली आहे. या वयात अधिक व्यक्ती असणे ही आर्थिक विकासाची मोठी संधी आहे. विकासाची ही संधी विविध देशानुसार साधारण 30 ते 40 वर्षापर्यंत असू शकते. या काळात प्रतिडोई उत्पन्नात वाढ होते. भारताला ही संधी उपलब्ध झालेली आहे. सर्वांना काम मिळाले आणि शैक्षणिक पात्रता वाढली तर भारत झपाट्याने प्रगतीच्या मार्गावर जाईल.